ePaper

॥ वर्ष - 7 । अंक - 322 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 13 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# चौथ्या टप्प्यात मत टप्पा वाढविण्याचे आव्हान



## आतील पानांत


- कोलकाता नाईट रायडरप्ले ऑफसमध्ये
- शिल्पाचं सडेतोड उत्तर
- ७५ वर्षांचे झाल्यानंतर मोदी निवृत्त ?
- माझ्या कुटुंबावर हल्ला करण्याचा डाव


## विलक्षण चुरशीने मतदान होणार

# पुण्यात मोहोळांकडे विजयाची ‘मुरली’!

### » लोकसभा रणसंग्राम : धंगेकर, मोरे प्रचारात बॅक फूटला

। पुणे । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

**पुणे लोकसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्ष महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचे पारडे निश्चितच जड आहे. यावेळी मोहोळ हेच विजयाची ‘मुरली’ वाजवणार, हे जवळजवळ निश्चित झाले आहे. पुण्यात आज (दि.१३ मे) अत्यंत चुरशीने मतदान अपेक्षित आहे.**







### विकासाची कामे विरुद्ध बोचरे टीकास्त्र

»पुण्यातील रणसंग्राम हा महायुती विरुद्ध महाआघाडी असाच झाला. यावेळी महाआघाडी कडून पुण्याचा विकास रखडला, प्रकल्पांमध्ये गैरव्यवहार झाले, महागाई, बेरोजगारी, आणल्या गेलेल्या प्रकल्पामुळे पर्यावरणाचा ऱ्हास आणि मेट्रो मार्ग रखडल्याचे मुद्दे पुढे आणण्यात आले. याउलट महायुतीकडून पुण्याचा वेगाने होत असलेला विकास अग्रस्थानी राहिला. हा वेग कायम ठेवण्यासाठी, विकसित भारताचा संकल्प करणाऱ्या मानरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीने साद घातली. सांडपाणी शुद्धीकरण पुण्यासाठी स्वतंत्र विमानतळ, मेट्रोचे जाळे, झोपडपट्टी पुनर्विकास, आणि वाहतूक कोंडीवर तोडगा हे मुद्दे हिरीरीने मांडण्यात आले.

या संपूर्ण रणसंग्रामात मोहोळ यांच्या प्रचाराचा धडाका पुणेकरांनी पाहिला आहे, अनुभवला आहे. कॉर्नर बैठकांपासून पदयात्रा बाईक रॅली आणि मोठमोठ्या नेत्यांच्या सभा यामुळे पुण्यातील राजकीय वातावरण पूर्णपणे ढवळून गेले आणि त्याचा फायदा मोहोळ यांना होणार हे निश्चित झाले. त्यांचे प्रमुख विरोधक काँग्रेसचे रवींद्र धंगेकर आणि वंचित आघाडी पुरस्कृत वसंत मोरे हे मात्र पूर्णपणे बॅकफूटला गेले आहेत.

पुण्यात गेल्या दोन निवडणुकांमध्ये भाजपचा उमेदवार तीन लाखापेक्षा जास्त मताधिक्क्याने निवडून आला आहे. अशा प्रकारचे मताधिक्य कायम राखणे हे मात्र मोहोळ यांच्या पुढील तगडे आव्हान आहे. या निवडणुकीत भाजपकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी, देवेंद्र फडणवीस अजित पवार चंद्रकांत पाटील आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे प्रचारासाठी रिंगणात उतरले. काँग्रेसकडून राहुल गांधी शशी थरूर पृथ्वीराज चव्हाण नाना पटोले बाळासाहेब थोरात यांच्यासह डझनभर आमदार पुण्यात तळ ठोकून होते.

प्रचार संपण्यापूर्वीच्या दोन दिवसात पुण्यातील वातावरण मात्र बदलवून टाकण्यात मनसेचे नेते राज ठाकरे यांच्या सभेला यश आल्याचे स्पष्ट दिसते. मोहोळ यांच्या प्रचारार्थ त्यांनी सारसबागेजवळ घेतलेली प्रचंड सभा ही गेमचेंजर ठरणार आहे. राज ठाकरे यांनी थेट हिंदू मतदारांना साद घातली असून मोहोळ यांच्याप्रमाणेच ज्या ज्या ठिकाणी भाजपचे, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार आहेत त्यांना मतदान करण्याचे आवाहन केले, आणि मुस्लिम फतव्यांवर जबरदस्त टीका केली.

# ‘मावळ’ ठरवणार खरी शिवसेना कोणाची?

### » प्रचारात रंगत : बारणे-वाघेरेंना भरभरून प्रतिसाद

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यातील चारही लढती चुरशीच्या होणार असल्या तरी मावळ लोकसभा मतदारसंघाकडे सर्वांचे लक्ष आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या तसेच उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारांमध्ये थेट लढत होत असून खरी शिवसेना कोणाची? याचे उत्तर मावळ मतदार संघ देणार आहे.**

मावळ मतदार संघामध्ये सलग तीन वेळा शिवसेनेने विजय मिळवला आहे. पण गेल्या काही वर्षात विलक्षण घडामोडी होऊन मूळ शिवसेनेतून बाहेर पडलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे सेनेत दोन उभे गट पडले. शिंदे यांच्या या शिवसेनेला निवडणूक आयोगाने अधिकृत मान्यता दिल्याने त्यांना महत्त्व आले असून त्यांच्यातर्फे श्रीरंग बारणे हा बालेकिल्ला लढवत आहेत. दुसरीकडे संजोग वाघेरे यांना उद्धव ठाकरे यांनी उमेदवारी दिली असून वाघेरे यांनीही जोरदार लढत देण्याचा दृष्टिकोन दाखवून दिला आहे.



एकनाथ शिंदे, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी हा मतदार संघ म्हणजे अत्यंत प्रतिष्ठेची लढत केलेली असल्यामुळे येथील प्रचाराची चुरस अगदी शिगेला पोहोचली आहे. उद्धव ठाकरे यांच्या गटातर्फे आदित्य ठाकरे यांनी तसेच रोहित पवार यांनी हा किल्ला लढवला. दोन्ही उमेदवारांच्या प्रचारसभांना आणि रॅलीजना मिळालेला प्रतिसाद पाहता ही लढत सोपी राहिलेली नाही. त्यामुळेच खरी शिवसेना आणि नकली शिवसेना असा मुद्दा पुढे आला असून खरी शिवसेना कोणाची? याचे उत्तर मावळचा शिवसैनिक देणार आहे.

### विकास कामे विरुद्ध मोदीविरोधी लाट

» येथे झालेल्या प्रचारसभांमध्ये त्याचप्रमाणे पदयात्रांमध्ये मा. मोदी यांनी केलेली विकास कामे आणि त्यांचा विकसित भारताचा संकल्प यावर सत्ताधाऱ्यांनी विशेष भर दिला. याउलट विरोधकांनी संपूर्ण देशात मोदी विरोधी लाट असल्याचा दावा केला आणि केंद्र तसेच राज्य सरकारवर विविध प्रकारचे आरोप करून मैदान गाजवले.

# शिरुरमध्ये होणार घड्याळाचा गजर!

## आढळराव पाटील यांनाच मतदार कौल देतील असा अंदाज

। घोडेगाव । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बहुचर्चित शिरूर लोकसभा मतदारसंघात यावेळी घड्याळाचा गजर होणार हे जवळजवळ स्पष्ट दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे निवडणुकीच्या रिंगणात असलेले शिवाजीराव आढळराव पाटील यांनाच मतदार कौल देतील असा अंदाज अनेक राजकीय विश्लेषकांनी केला आहे.**



आढळराव पाटील यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी हा संपूर्ण मतदारसंघ अक्षरशः पिंजून काढला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे झंझावाती दौरे आणि मूळ शिवसैनिक असणाऱ्या आढळराव यांच्यासाठी केलेले अपील मतदारांना चांगलेच भावले आहे. अजितदादा यांनी ही निवडणूक भावनिक त्याचप्रमाणे विकास कामांवर आधारित केल्याने त्याचा पगडा ही चांगला पडला आहे. या निवडणुकीमध्ये शरद पवार गटाचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे, त्यांच्या गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे त्याचप्रमाणे रोहित पवार आणि स्वतः शरद पवार यांनी सभांमधून वैयक्तिक टीका करण्यापलीकडे काहीच केले नाही.

विकासाचा कसलाही आराखडा त्यांच्यापुढे नव्हता, केवळ अभिनेता म्हणून गाजलेल्या कोल्हे यांना मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. याउलट महाआघाडीच्या नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या दृष्टिकोनात वर नजर टाकली.

त्यांच्या नेतृत्वाखाली देशाची होत असलेली प्रगती आणि संपूर्ण जगात भारताचा वाढत असलेला दबदबा यावर भर दिला.

मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी आपल्याला ४०० खासदारांची संख्या पार करायची आहे आणि त्यात एक खासदार हा शिरूरचा असेल असे केलेले आवाहन मतदारांना आढळराव यांना कौल देण्यासाठी पुरेसे ठरणार आहे.

### नेता विरुद्ध अभिनेता

प्रचाराच्या मुख्य प्रवाहात असताना डॉ. अमोल कोल्हे यांच्या रूपाने तुम्हाला बिन कामाचा अभिनेता हवा आहे का सतत काम करणारा कार्यकर्तारुपी नेता हवा आहे असे महायुतीच्या सर्वच नेत्यांनी आवाहन केल्यामुळे आढळराव यांना मार्ग सोपा झाला आहे. त्यात डॉ. कोल्हे यांची अत्यंत उर्मट भाषा, अजित दादा पवार यांच्याबाबत वापरलेले तिखट शब्द आणि केलेली विषारी टीका जनतेला मुळीच आवडलेली नाही. त्याचा बदला ते मतदानाच्या रूपाने घेतील याची सर्वांना खात्री आहे.

### मतदानावर बहिष्कार

शिरूरच्या तळेगाव तालुक्यातील ढमढेरे जवळ असणाऱ्या भैरवनाथनगर येथील नागरिकांनी लोकसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. गेली ५० वर्षांपासून वस्तीत सुविधांची वाणवा असून याबाबत नागरिकांना नुसते आश्वासनांचे गाजर दाखवून मतं घेतली जातात. प्रत्यक्षात मात्र परिस्थिती जैसे थेच. परिणामी यंदाच्या निवडणुकीत ग्रामस्थांनी मतदान न करण्याचाच पवित्रा घेतला आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघात हा चर्चेचा विषय ठरत आहे.

---

# जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांची मतदान केंद्रांना भेट

## पावसाची शक्यता लक्षात घेता ईव्हीएम यंत्राच्या सुरक्षेबाबतही दिल्या सूचना

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात मावळ, पुणे आणि शिरूर लोकसभा मतदासंघाकरीता सोमवार १३ मे रोजी मतदान होणार असून गेल्या दोन दिवसापासून शहरात सुरू असलेल्या अवकाळी पावसाच्या पार्श्वभूमीवर पुणे लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी पुणे शहरातील विविध मतदारसंघातील साहित्य वितरण केंद्र आणि मतदान केंद्रांना भेट देवून तेथील व्यवस्थेचा आढावा घेतला.**



सकाळपासूनच जिल्हाधिकारी डॉ. दिवसे हे मतदान साहित्य वितरण केंद्राला भेट देत होते. या भेटी दरम्यान डॉ. दिवसे यांनी संबंधित मतदार संघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून साहित्य वितरण करण्यासाठी केलेल्या नियोजनाची माहिती घेतली. तसेच मतदान केंद्रावरील व्यवस्थेचाही आढावा घेतला.

साहित्य वितरण प्रक्रिया वेळेत आणि शांततेत पार पाडावी, अशा सूचनाही त्यांनी संबंधितांना दिल्या. पावसाची शक्यता लक्षात घेता ईव्हीएम यंत्राच्या सुरक्षेबाबतही त्यांनी यावेळी सूचना दिल्या.

### सुरक्षा व्यवस्थेबाबत चर्चा

जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी कृषी महाविद्यालय येथील शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाचे साहित्य वितरण केंद्र, विश्वशांती गुरुकुल विद्यालय एमआयटी संस्था येथील कोथरुड विधानसभा मतदारसंघाचे साहित्य वितरण केंद्र, शेठ दगडुराम कटारिया महाविद्यालय महर्षीनगर येथील पर्वती विधानसभा मतदारसंघाचे साहित्य वितरण केंद्र, हडपसर येथरील केंद्र व अल्पबचत भवन येथील पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघाच्या साहित्य वितरण केंद्रांना भेटी देऊन पाहणी केली. डॉ. दिवसे यांनी भेटीदरम्यान पाऊस आल्यास घ्यावयाच्या दक्षतेबाबत सूचना केल्या. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांशी देखील सुरक्षा व्यवस्थेबाबत चर्चा केली. शहराच्या मध्यवर्ती भागात मतदान केंद्र परिसरातील वाहनतळ व्यवस्थेचीही त्यांनी माहिती घेतली.

# मावळ लोकसभा: मतदान यंत्रणा सज्ज!

## घारापुरी मतदान केंद्रावर पोहोचण्यासाठी कर्मचाऱ्यांचा बोटीतून प्रवास

। उरण । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**घारापुरी...समुद्रातलं असं ऐतिहासिक ठिकाण की जेथे पर्यटक एलोरा गुंफा पाहण्यासाठी मुंबईच्या गेट वे ऑफ इंडियावरुन बोटीने प्रवास करुन पोहोचतात. पण आज मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांचे समुद्र पर्यटन घडले ते लोकसभा निवडणुकीचे मतदान पार पाडण्यासाठी...**



मावळ लोकसभा मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणूकीसाठी सोमवार दि. १३ मे २०२४ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार असून विधानसभा मतदारसंघनिहाय निश्चित केलेल्या ठिकाणाहून काल सकाळी ८ वाजेपासून मतदान साहित्य वितरण प्रक्रियेला सुरूवात झाली. मतदानासाठी आवश्यक असणारे बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट यंत्र मतदान पथकनिहाय ताब्यात देण्यात आले. तसेच विविध लिफाफे, स्टेशनरी, ओआरएससह प्रथमोपचारपेटी, दिशादर्शक फलक, मतदान प्रक्रीया पार पाडण्यासाठी आवश्यक साहित्य, विविध अहवालाच्या प्रती आणि मार्गदर्शक सूचना साहित्य यावेळी पथकाकडे सुपूर्द करण्यात आले. या पथकांना नेमून दिलेल्या मतदान केंद्रांवर घेऊन जाण्यासाठी वाहतूक व्यवस्थाही करण्यात आली होती. या लोकसभा क्षेत्रात उरण विधानसभा मतदार संघ येतो.

उरण मतदारसंघातील मतदान केंद्रांसाठी मतदान साहित्याचे वितरण जसई येथील डी.बी पाटील मंगल कार्यालयातून करण्यात आले. यामधील ५८ क्रमांकाचे घारापुरी मतदान केंद्र आहे. अरबी समुद्रातील बेटावरील हे मतदान केंद्र असून तेथे ३८९ पुरूष आणि ४२० महिला असे एकूण ८०९ मतदार वास्तव्य करतात. या मतदान केंद्रासाठी स्वतंत्र क्षेत्रीय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. १ मतदान केंद्राध्यक्ष, २ मतदान अधिकारी, १ मतदान सहाय्यक यांनी आज उरण मधून मतदानाचे साहित्य ताब्यात घेतले आणि सोबत पोलीस बंदोबस्त घेऊन मतदान कर्मचाऱ्यांचे हे पथक आधी जीप वाहनाने जेएनपीटी बंदरापर्यंत आले. आणि तेथून थेट बोटीने मतदान साहित्य घेऊन घारापुरीतल्या या मतदान केंद्रावर पोहोचले. लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक मतदार महत्वाचा असल्याने उरण विधानसभा मतदारसंघातील घारापुरी मतदान केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी बोटीचा वापर करून मतदान पथकाने समुद्र मार्गाने प्रवास केला. मतदान कर्मचाऱ्यांनी प्रवासाचे हे अंतर पूर्ण करून मतदान केंद्रावर साहित्य पोहोचविले. उरण विधानसभा मतदार संघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी जनार्दन कासार यांचे या सर्व घडामोडीवर लक्ष ठेऊन होते.

### कर्मचाऱ्यांची भूमिका महत्वाची

देशाच्या प्रत्येक पात्र मतदाराला लोकशाहीच्या या महाउत्सवात सहभागी होता यावे यासाठी या कर्मचाऱ्यांची भूमिका महत्वाची आहे. जिल्ह्यासह राज्याच्या इतरही भागात मतदान कर्मचारी अशा विविध परिस्थितीत कर्तव्य बजावत असून नागरिकांना या उत्सवात सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

# अपप्रचारावर कोणीही विश्वास ठेवू नये

## खोडसाळपणा करणाऱ्यांवर कारवाई करा: अश्विनी जगताप

### संपूर्ण जगताप परिवार व समर्थक श्रीरंग बारणे यांच्या पाठीशी

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'मतदानाच्या एक दिवस आधी सांगवी पिंपळे गुरव परिसरात लावण्यात आलेल्या खोडसाळ जाहिरात फलकांशी आमचा काहीही संबंध नाही. मतदारांनी कोणत्याही अपप्रचाराला बळी पडू नये. संपूर्ण जगताप परिवाराचा पाठिंबा महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनाच आहे, अशी ठाम भूमिका चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप यांनी घेतली आहे. 'साहेबांनी' स्वतः 2019 मध्ये बारणे यांना 96 हजारांचे मताधिक्य मिळवून दिले होते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.**



लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप कट्टर समर्थक या नावाने खोडसाळ अपप्रचार करणारे काही जाहिरात फलक मतदानाच्या तोंडावर सांगवी, पिंपळे गुरव भागात लावण्यात आले आहेत. त्याचा आमदार अश्विनी जगताप यांनी निषेध केला. प्रशासनाने या फलकांवर व फलक लावणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

आमदार अश्विनी जगताप म्हणाल्या की, दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे कट्टर मोदी समर्थक होते. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी भाजप वाढविण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी नेहमीच महायुतीच्या धर्माचे पालन केले. 2014 मध्ये राजकीय परिस्थिती वेगळी होती.

भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर साहेबांनी महायुती धर्माचे कायम पालन केले होते. 2019 मध्ये साहेबांनी बारणे यांचा जोरदार प्रचार करून त्यांना तब्बल 96 हजारांचे मताधिक्य मिळवून दिले होते. साहेबांच्या विधानसभा निवडणुकीतही बारणे यांनी मोठी मदत केली होती. पोटनिवडणुकीतही बारणे यांचे सहकार्य लाभले होते. 'साहेब' हे शेवटच्या श्वासापर्यंत महायुतीचे कट्टर समर्थक होते. त्यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे संपूर्ण जगताप परिवार व त्यांचे समर्थक सदैव महायुतीच्या पाठीशी राहतील.

लोकनेते लक्ष्मण जगताप यांचा कोणताही समर्थक अशा प्रकारे खोडसाळ अपप्रचार करणारे फलक लावणे शक्य नाही.

त्यामागे महायुतीच्या विरोधकांचाच हात आहे, असा आरोप आमदार जगताप यांनी केला. महायुतीचे उमेदवार खासदार बारणे यांना चिंचवड मतदारसंघातून एक लाख पेक्षा अधिक मताधिक्य देण्याचा शब्द दिवंगत साहेबांच्या वतीने मी स्वतः आणि भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी दिला आहे. तो शब्द पाळणे हे प्रत्येक समर्थकाचे कर्तव्य आहे, असेही त्या म्हणाल्या.

### मतदानप्रक्रियेसाठी 6 हजार पोलिसांचा फौजफाटा तैनात



पिंपरी : पुणे शहर, शिरूर आणि मावळ लोकसभा मतदारसंघासाठी सोमवारी (दि.१३) मतदान होणार आहे. या तीनही मतदासंघांचा काही भाग पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत येतो. त्यात आयुक्तालयाच्या हद्दीत ४०७ मतदान केंद्रे, तर १ हजार ७८७ बूथ आहेत. त्यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदानप्रक्रियेसाठी सहा हजार पोलिसांचा फौजफाटा तैनात केला आहे. संवेदनशील केंद्रांवर जादा कुमक तैनात करण्यात येणार आहे. विशेष पथकांकडूनही अशा केंद्रांवर 'वॉच' राहणार आहे. काल प्रचाराच्या तोफा शनिवारी थंडावल्या. त्यानंतर प्रत्यक्ष मतदानप्रक्रियेसाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. त्यानुसार सहा हजार पोलिसांचा फौजफाटा तैनात असणार आहे. यामध्ये पोलिस आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्यासह सहा उपायुक्त, ११ सहायक आयुक्त, ३२५ अधिकारी (पोलिस निरीक्षक, सहायक निरीक्षक, उपनिरीक्षक), चार हजार अंमलदार, १५०० होमगार्ड, केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाच्या सहा पथकांचा समावेश आहे. यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसह सुमारे अडीच हजार पोलिसांचा बंदोबस्त शहराबाहेरून मागवला आहे.

# मोदींच्या पंतप्रधानपदामध्ये महाराष्ट्राचा वाटा किती?



## लोकसभेसाठी चुरस

**आदरणीय नरेंद्रजी मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी 'एनडीए' ने संपूर्ण देशभर जंग पछाडले आहे. मोदींना केवळ पंतप्रधानच बनवायचे नाही, तर त्यांना ४०० पेक्षा जास्त खासदार देऊनच त्या मानाच्या खुर्चीत बसवायचे आहे, असा निर्धार भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी केला आहे. या सर्व घडामोडींमध्ये महाराष्ट्राला अनन्य साधारण महत्त्व आले आहे.**

नरेंद्रजी मोदी यांना पुन्हा पंतप्रधान बनवायचे असेल, आणि त्यासाठी प्रचंड बहुमत पाहिजे असेल तर उत्तर प्रदेशमध्ये असलेल्या ८० जागा महत्त्वाच्या आहेतच, पण त्या पाठोपाठ क्रमांक दोन वर असलेल्या महाराष्ट्रातील ४८ जागा तितक्याच महत्त्वाच्या आहेत. एनडीएने संपूर्ण महाराष्ट्र अक्षरशः पिंजून काढला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने सर्वच वातावरण निर्मिती झाली आहे. संपूर्ण राज्यात मोदीमय वातावरण करण्यात ते यशस्वी झाले आहेत, हे वेगळे सांगायला नको !



दुसरीकडे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या एक डझनापेक्षा जास्त प्रचारसभा महाराष्ट्रात झाल्या आहेत. आणखी सभा व रोड शो होणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याही अनेक सभा झाल्या आहेत. आता शेवटच्या टप्प्यात मनसेचे नेते राज ठाकरे मैदानात उतरले आहेत. महाराष्ट्रातील ४८ पैकी ४५ जागा जिंकायच्या असे भाजपाने प्रारंभी जाहीर केले. नंतर काहींनी उत्साहाच्या भरात सर्व ४८ जागा महायुती जिंकणार असेही म्हटले. राज्यात व केंद्रात भाजपाप्रणीत एनडीएची सत्ता आहे म्हणून शंभर टक्के टार्गेट साध्य करता येईल, असा विश्वास भाजपाच्या नेत्यांना आहे. भाजपाच्या सभांमध्ये फडणवीस आत्मविश्वासाने भाषण करीत आहेत. त्यांच्याबरोबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, राष्ट्रवादी व शिवसेनेचे आजी-माजी मंत्री महायुतीच्या मंचावर दिसत आहेत. ज्यांनी पाच वर्षांपूर्वी भाजपाच्या विरोधात राणाभीमदेवी थाटात भाषणे केली, भाजपाचा पराभव म्हणून प्रचार केला ते नेते आता भाजपाच्या उमेदवाराला प्रचंड बहुमताने निवडून द्या, असे जोरजोराने सांगत आहेत. गेल्या दोन-अडीच वर्षांत शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसची मोठी तोडफोड झाली. दोन्ही पक्षांतील ताकदवान गट भाजपाच्या आडोशाला गेला. जे भाजपाचा पराभव करून आमदार-खासदार झाले, ते सुद्धा भाजपाचा हिरीरीने प्रचार करताना दिसत आहेत. हा सर्व चमत्कार मोदी करिष्म्याने घडवला आहे. यंदाच्या निवडणुकीत दोन्ही शिवसेना डझनभर मतदारसंघांत एकमेकांना पाडण्यासाठी लढत आहेत. तसेच काका-पुतण्या, भाऊ-भाऊ, नणंद-भावजय सुद्धा एकमेकांना आव्हान देऊन निवडणूक रिंगणात आहेत. एकेकाळी महाराष्ट्र म्हणजे काँग्रेसचा गड होता. २०१४च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेना-भाजपा युतीने ४२ जागा जिंकल्या तेव्हाच काँग्रेसचे बुरुज ढासळले. २०१९ च्या निवडणुकीतही ४८ पैकी ४१ खासदार सेना-भाजपा युतीचे निवडून आले व चंद्रपूरमधून काँग्रेसचा एकमेव खासदार निवडून आला. त्यानंतर काँग्रेसचे अस्तित्व नावापुरते राहिले.

**फुटलेल्या पक्षांमुळे चुरस**

ठाकरे यांची शिवसेना व शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष फुटले आणि राज्याचे राजकारणच बदलले. पक्ष फुटीचे खापर दोन्ही पक्ष भाजपावर विशेषत: मोदी व फडणवीसांवर फोडत आहेत. पण या दोन्ही पक्षांच्या नेतृत्वाला आपले पक्ष सांभाळता आले नाहीत, याचे आत्मपरीक्षण कुणी करायचे? मोदींची लोकप्रियता घसरते आहे, मोदी पुन्हा सत्तेवर येणार नाहीत, एनडीएला पंचवीसपेक्षा जास्त जागा महाराष्ट्रातून मिळणार नाहीत, अशी गणिते रोज सोशल मीडियावर मांडली जात आहेत, पण मोदी-मोदी जयघोष करणाऱ्या मतदारांची संख्या लाखोंच्या घरात आहे. सन २०१४ व २०१९ मध्ये मोदींना देशात पर्याय नव्हता व २०२४ मधेही देशपातळीवर पर्याय नाही. पण इंडियाकडे पंतप्रधानपदाचा चेहरा कोण या प्रश्नाचे उत्तर आघाडीतील २६ पक्षांना देता आलेले नाही. तसेच मोदींची लोकप्रियता उत्तुंग असताना भाजपाला राज्यात दोन मोठे पक्ष का फोडावे लागले, याचे उत्तरही कोणी देत नाही. 'अब की बार...' घोषणा सत्यात उतरावयाची असेल, तर महाराष्ट्रातील खासदारांचे संख्याबळ भाजपाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे आणि महाराष्ट्रातून जास्तीत जास्त खासदार निवडून येण्यासाठी ताकद लावायला हवी!

## संपादकीय »

### फाशीचे काळे कुट्ट दिवस !

***बाळकृष्ण उपाख्य बापूराव चापेकरांनी फाशीच्या आदल्या दिवशी उपास केला व प्रार्थनेत शांतपणे दिवस व्यतीत केला. सकाळी निघताना त्यांनीसुद्धा हाती गीता घेतली. भजन म्हणत तख्ताजवळ आले. अधिपत्र वाचून दाखवल्यावर काही सांगणे नाकारले.***

'जय शंकर' चा घोष करत ते तख्तावर चढले. तोंडावर काळी टोपी चढ़वताच पुन्हा 'जय शंकर' चा घोष केला. फास गळ्यात पड़ताच छाती भरून श्वास घेतला. खटका ओढताच सहा फूट गर्तेत त्यांचे शरीर लोम्बकळू लागले....! या बलिदानामुळे एक पर्व संपले..!! ८,१० आणि १२ मे १८९९...एक दिवसाआड़ दोन चापेकर व एक रानडे फासावर चढले. खरेतर रँडशाहीतील अत्याचारांचा त्यांना व्यक्तिगत त्रास झाला नव्हता पण देशबंधुन्ना होणाऱ्या। त्रासामुळे ते खवळून उठले.या साहसात घरातील तीन कर्ते पुरुष संपले. मागे केवळ तीन विधवा,लहान मुले आणि वृद्ध वडील उरले.क्रांतीवेदीवरील हे बलिदान दिव्य होते. पुढे अनेक तरुणांना यापासून प्रेरणा मिळाली. तीन सख्खे भाऊ देशकार्यार्थ फासावर जाण्याचे हे जगातील एकमेव उदाहरण होय.. त्यांना शत शत नमन..!!

काँग्रेसचे विधानसभेतील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबईमध्ये लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान भाजप उमेदवार उज्वल निकम यांच्यावर टीका करताना मुंबईवर हल्ला करणारा पाकिस्तानी अतिरेकी अजमल कसाब आणि त्याच्या साथीदारांना क्लिन चीट दिली.

# काँग्रेसकडून अजमल कसाबला क्लीन चिट

मुंबईमध्ये झालेल्या २६/११च्या दहशतवादी हल्ल्यामागे पाकिस्तानी अतिरेकी संघटना आणि पाकिस्तान सरकारचा स्पष्ट सहभाग दिसत असूनही त्यांना शेवटपर्यंत सावरून घेण्याची भूमिका तत्कालीन यूपीए आणि महाराष्ट्रातील काँग्रेस राष्ट्रवादी सरकारने निभावली होती.

त्यासाठीच सुरुवातीला हा दहशतवादी हल्ला पाकिस्तानी अतिरेक्यांकडून नाही तर भारतातीलच हिंदुत्ववादी संघटनांनी घडवून आणल्याचा दावा अनेक काँग्रेस नेते करत होते. परंतु पुढे `एन आय ए'च्या तपासात हे आंतरराष्ट्रीय षडयंत्र पाकिस्ताननेच भारतातील स्थानिक जिहादी संघटनांच्या स्लीपर सेलला हाताशी धरून रचल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे या दहशतवादी कटाचे प्रमुख सूत्रधार अजूनही पाकिस्तानात मोकाट असले तरी किमान प्रत्यक्ष सहभागी अजमल कसाबला तरी न्यायालयाच्या तत्परतेमुळे नाईलाजास्तव फाशीची शिक्षा देणे यूपीए सरकारला भाग पडले.

अन्यथा हा दहशतवादी हल्ला म्हणजे हिंदू दहशतवाद असल्याचा फेक अजेंडा काँग्रेस आणि त्यांच्या इकोसिस्टीम मधील पिलावळीने सहज सेट केला असता. आपल्या बेछुट आणि तर्कशून्य वक्तव्यासाठी कुप्रसिद्ध असणाऱ्या वडेट्टीवारने कसाब केसमधील तत्कालीन सरकारी वकील उज्वल निकम यांच्यावर पोलीस अधिकारी हेमंत करकरे यांच्या मृत्यूबाबत महत्त्वपूर्ण माहिती न्यायालयापासून लपवल्याचा आरोप केला आहे. यासाठी वडेट्टीवारने माजी पोलीस अधिकारी एके मुश्रीफ लिखित हु किल्ड हेमंत करकरे या पुस्तकाचा आधार घेतला आहे म्हणे. तर हा एके मुश्रीफ नेमका आहे तरी कोण? याच मुश्रीफने १९९३ पासून २००८ पर्यंत मुंबईसह देशभरात झालेल्या प्रत्येक दहशतवादी हल्ल्यासाठी आरएसएस आणि हिंदुत्ववादी संघटनांना जबाबदार असण्याच्या असंख्य काल्पनिक कॉन्सपिरसी थेरी मांडल्या होत्या.

मुश्रीफच्या मते अल कायदा, लष्करे तोएबा, इंडियन मुजाहिद्दीन किंवा सिमी या शांतताप्रिय संघटना असून त्यांचा भारतातील कोणत्याही अतिरेकी कारवाईत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध कधीच नव्हता. त्यामुळे या मुश्रीफने मुंबईतील दहशतवादी हल्ल्याविषयी लिहिलेल्या पुस्तकात अशीच एक नवीन कॉन्सपिरसी थेरी अपेक्षित होती. तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सुशील कुमार शिंदे यांनी ज्या तथाकथित हिंदू दहशतवादाचा उल्लेख केला होता. त्याचा जनक हाच एके मुश्रीफ म्हणावा लागेल. मुश्रीफने लिहिलेल्या पुस्तकातील संदर्भावरून वडेट्टीवारचा दावा असा आहे की करकरे यांचा मृत्यू जा गोळ्यांच्यामुळे झाला त्या पाकिस्तानी अतिरेकी अजमल कसाब किंवा त्याचा साथीदार इकबाल याच्या गोळीतून बंदुकीतून झाडल्या गेल्या नव्हत्या. त्या गोळ्या आरएसएस समर्थक पोलीस अधिकाऱ्यांनीच मारल्या होत्या. का तर म्हणे हेमंत करकरे आरएसएसचा दहशतवादी चेहरा जगासमोर आणत होते.

## ।। अभंगवाणी ।।



सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती ।
रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्व काळ ॥ध्रु.॥
विठो माउलिये हा चि वर देईं ।
संचरोनि राहीं हृदयामाजी ॥२॥
तुका म्हणे कांहीं न मागे आणीक ।
तुझे पायीं सुख सर्व आहे ॥३॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 93 पिशव्यांना केवळ 10 हजार रूपये पट्टी

## सोलापुरात कांद्याची आवक कमी होऊनही दरात घसरण

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान होऊन आठवडाही उलटत नाही, तोच सोलापुरात कांदा दराची घसरण सुरू झाली असून त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे. माढा तालुक्यातील एका कांदा उत्पादक शेतकऱ्याना आणलेल्या कांद्याच्या ९३ पिशव्यांना केवळ १० हजार रूपयांचा भाव मिळाला. या शेतकऱ्याने कांद्याच्या लागवडीसाठी केलेला खर्च ६० हजार रूपयांपर्यंत झाला होता.**



प्रत्यक्षात त्याच्या हातात कांद्याची पट्टी १० हजार रूपये आली.सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये सध्या कांद्याची आवक घटून १६ हजार ७०० क्विंटलपर्यंत होत असूनही कांद्याच्या दरात वाढ होण्याऐवजी घट होत आहे. लोकसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान ७ मे रोजी झाले. त्याअगोदर सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये दररोज २५ हजार क्विंटलपर्यंत कांद्याची आवक होत होती. त्यावर प्रतिक्विंटल दर १४०० रूपये ते २७०० रूपयांपर्यंत मिळत होता. परंतु लोकसभेचे मतदान होऊन आठवडाही होत नाही तोच कांद्याची आवक कमी होऊन सुध्दा कांदा दर वाढण्याऐवजी उलट घटत चालला असल्याचे दिसून येतेदोन दिवसांपूर्वी सुमारे २५ हजार क्विंटल कांदा दाखल झाला असता दर घसरण होऊन कमाल दर २२०० रूपये आणि सरासरी दर ११०० रूपये मिळत होता. त्यानंतर कांदा आवक १६ हजार ७०० क्विंटलपर्यंत खाली आली असता दर मात्र एक हजार ते दोन हजार रूपयांपर्यंत मिळाला आहे. सरासरी दरापेक्षा कमी म्हणजे पाचशे रूपयांपर्यंत दर मिळालेल्या कांद्याचे प्रमाण जास्त आहे.माढा तालुक्यातील दारफळ सीना येथील कांदा उत्पादक शेतकरी पृथ्वीराज चव्हाण यांनी सुमारे ६० हजार रूपये लागवड खर्च करून पिकविलेला ९३ पिशव्या कांदा विक्रीसाठी सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये आणला असता सूर्या लकी ट्रेडर्समध्ये कांद्याला कवडीमोल दर मिळाला. त्याच्या हातात केवळ १० हजार रूपयांची पट्टी आली. लागवड खर्चाच्या २० टक्के खर्च निघाला नाही. त्याबद्दल पृथ्वीराज चव्हाण यांनी खंत व्यक्त नशिबाला दोष दिला आहे. असे अनेक शेतकरी कांदा दर घसरणीमुळे निराश झाले आहेत.प्रत्यक्षात त्याच्या हातात कांद्याची पट्टी १० हजार रूपये आली.सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये सध्या कांद्याची आवक घटून १६ हजार ७०० क्विंटलपर्यंत होत असूनही कांद्याच्या दरात वाढ होण्याऐवजी घट होत आहे. लोकसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान ७ मे रोजी झाले. त्याअगोदर सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये दररोज २५ हजार क्विंटलपर्यंत कांद्याची आवक होत होती. त्यावर प्रतिक्विंटल दर १४०० रूपये ते २७०० रूपयांपर्यंत मिळत होता. परंतु लोकसभेचे मतदान होऊन आठवडाही होत नाही तोच कांद्याची आवक कमी होऊन सुध्दा कांदा दर वाढण्याऐवजी उलट घटत चालला असल्याचे दिसून येतेदोन दिवसांपूर्वी सुमारे २५ हजार क्विंटल कांदा दाखल झाला असता दर घसरण होऊन कमाल दर २२०० रूपये आणि सरासरी दर ११०० रूपये मिळत होता. त्यानंतर कांदा आवक १६ हजार ७०० क्विंटलपर्यंत खाली आली असता दर मात्र एक हजार ते दोन हजार रूपयांपर्यंत मिळाला आहे. सरासरी दरापेक्षा कमी म्हणजे पाचशे रूपयांपर्यंत दर मिळालेल्या कांद्याचे प्रमाण जास्त आहे.

### लागवड खर्चाच्या 20 टक्के खर्च निघाला

माढा तालुक्यातील दारफळ सीना येथील कांदा उत्पादक शेतकरी पृथ्वीराज चव्हाण यांनी सुमारे ६० हजार रूपये लागवड खर्च करून पिकविलेला ९३ पिशव्या कांदा विक्रीसाठी सोलापूर कृषिउत्पन्न बाजार समितीमध्ये आणला असता सूर्या लकी ट्रेडर्समध्ये कांद्याला कवडीमोल दर मिळाला. त्याच्या हातात केवळ १० हजार रूपयांची पट्टी आली. लागवड खर्चाच्या २० टक्के खर्च निघाला नाही. त्याबद्दल पृथ्वीराज चव्हाण यांनी खंत व्यक्त नशिबाला दोष दिला आहे.

# राज ठाकरेंचं पुन्हा 'लाव रे तो व्हिडीओ

## सुषमा अंधारेंची क्लिप दाखवत उद्धव ठाकरेंवर टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिनशर्त पाठिंबा देण्याची घोषणा केल्यानंतर महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यास सुरुवात केली आहे. आज त्यांनी ठाण्यातील शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या प्रचारासाठी सभा घेतली. या सभेत त्यांनी पुन्हा एकदा २०१९ प्रमाणे 'लाव रे तो व्हिडीओ' म्हणत व्हिडीओ लावला.**

मात्र यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा नाही तर सुषमा अंधारे यांच्या भाषणाची क्लिप दाखविण्यात आली. या क्लिपवरून त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. "उद्धव ठाकरे हे वारंवार माझे वडील चोरले असे म्हणत आहेत", या विधानाचाही समाचार राज ठाकरे यांनी घेतला. राज ठाकरे म्हणाले, "वडील चोरले हा निवडणुकीचा विषय असू शकतो का? फोडाफोडीचे राजकारण मला मान्य नाही. पण जे लोक आज आमचा पक्ष फोडला म्हणून बोलत आहेत, त्यांनी त्यांच्या इंडिया आघाडीतील नेत्यांकडे एकदा पाहावे. त्यांनी याआधी काय उद्योग केलेत? हे आठवा. याच उद्धव ठाकरेंनी मनसेचे सात पैकी सहा नगरसेवक खोके देऊन तोडले होते. तेव्हा तुम्हाला काही नाही वाटलं."महाराष्ट्रात फोडाफोडीच्या राजकारणाची



कुणी सुरुवात केली असेल तर ती शरद पवारांनी केली. पुलोदची स्थापना करून त्यांनी काँग्रेसला फोडले. त्यानंतर १९९१ साली शरद पवारांनी छगन भुजबळांना बाहेर काढून बाळासाहेबांची शिवसेना फोडली. तेव्हा शिवसेनेचे आमदार फोडण्याचे काम शरद पवारांनी केले. आज छगन भुजबळ याबाजूला आहेत. मी बाहेरून पाठिंबा दिला असल्यामुळे मी काहीही बोलू शकतो, असेही राज ठाकरे म्हणाले. त्यानंतर नारायण राणे यांना घेऊन काँग्रेसने शिवसेना फोडली गेली", अशी आठवण राज ठाकरे यांनी सांगितली.यानंतर राज ठाकरे यांनी लाव रे तो व्हिडीओ असं म्हणत सुषमा अंधारे यांचा जुना व्हिडीओ दाखविला. त्या व्हिडीओमध्ये सुषमा अंधारे यांनी बाळासाहेब ठाकरेंचा उल्लेख 'म्हातारा' असा केला होता. या व्हिडीओच्या अनुषंगाने राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली. जर तुमचे वडिलांवर प्रेम असते तर बाळासाहेबांबद्दल आक्षेपार्ह बोलणाऱ्या सुषमा अंधारेंना पक्षात घेऊन प्रवक्ते पद का दिले? असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला. ज्या छगन भुजबळांनी बाळासाहेबांना अटक करण्याचा प्रयत्न केला होता, त्या भुजबळांबरोबर तुम्ही २०१९ साली मंत्रीपदाची शपथ घेतली. तेव्हा वडिलांना अटक करायला लावणाऱ्या व्यक्तीबरोबर मंत्रिमंडळात कसे बसलात?मात्र यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा नाही तर सुषमा अंधारे यांच्या भाषणाची क्लिप दाखविण्यात आली. या क्लिपवरून त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. "उद्धव ठाकरे हे वारंवार माझे वडील चोरले असे म्हणत आहेत", या विधानाचाही समाचार राज ठाकरे यांनी घेतला.राज ठाकरे म्हणाले, "वडील चोरले हा निवडणुकीचा विषय असू शकतो का? फोडाफोडीचे राजकारण मला मान्य नाही.

### व्हा तुम्हाला काही नाही वाटलं

पण जे लोक आज आमचा पक्ष फोडला म्हणून बोलत आहेत, त्यांनी त्यांच्या इंडिया आघाडीतील नेत्यांकडे एकदा पाहावे. त्यांनी याआधी काय उद्योग केलेत? हे आठवा. याच उद्धव ठाकरेंनी मनसेचे सात पैकी सहा नगरसेवक खोके देऊन तोडले होते. तेव्हा तुम्हाला काही नाही वाटलं."महाराष्ट्रात फोडाफोडीच्या राजकारणाची कुणी सुरुवात केली असेल तर ती शरद पवारांनी केली. पुलोदची स्थापना करून त्यांनी काँग्रेसला फोडले.

# मोफत शिक्षण, शेतकऱ्यांना हमीभाव!

## सैन्याला विशेष अधिकार; केजरीवालांनी जाहीर केल्या 10 गॅरंटी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने १ जूनपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केल्यानंतर ते तुरुंगातून बाहेर आले. यानंतर आज अरविंद केजरीवाल यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षाच्या १० गॅरंटी जाहीर केल्या आहेत. यामध्ये अग्निवीर योजना बंद कली जाईल, देशभरात दिल्ली-पंजाबसारखी २०० युनिटपर्यंत २४ तास मोफत वीज, कत्रांटी नोकऱ्या बंद करून कायमस्वरूपी नोकऱ्या देण्यात येतील, यासह आधी मोठ्या घोषणा अरविंद केजरीवाल यांनी केल्या आहेत.**



मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पत्रकार परिषद घेत मोठ्या घोषणा केल्या आहेत. देशातील सर्व गरिबांना २०० युनिटपर्यंत मोफत वीज देण्याची घोषणा त्यांनी केली. आपल्या देशात ३ लाख मेगावॅट विजनिर्मिती करण्याची क्षमता आहे. मात्र, आपण त्याचा वापर फक्त २ लाख मेगावॅट एवढाच करतो, असं केजरीवाल यांनी सांगितलं. आमची दुसरी गॅरंटी ही शिक्षणसाठी आहे. सर्वांसाठी चांगले आणि उत्कृष्ट तसेच मोफत शिक्षण देऊ. सरकारी शाळा या खासगी शाळांपेक्षा जास्त चांगले शिक्षण देऊ शकतात. आम्ही शिक्षणाचे मॉडेल दिल्लीत राबवले आहे, असंही केजरीवाल यांनी सांगितलं. आम्ही तिसरी गॅरंटी ही आरोग्याची देत आहेत. प्रत्येकासाठी चांगल्या प्रकारचा उपचार मिळायला हवा. प्रत्येक गावात मोहल्ला दवाखाने उघडले जातील. जिल्हा रुग्णालयांचे मल्टीस्पेशालिटी रुग्णालयात रूपांतर केले जाईल, असंही केजरीवाल यांनी सांगितलं. अग्निवीर योजना लष्करासाठी घातक असून ती कायम स्वरुपी बंद केली जाईल. याबरोबरच कत्रांटी नोकऱ्या बंद करून कायमस्वरूपी नोकऱ्या दिल्या जातील. तसेच भारतीय सैन्यास विशेष अधिकार दिले जातील,असं आश्वासनही केजरीवाल यांनी दिलं. पुढं अरविंद केजरीवाल यांनी सांगितलं, शेतकऱ्यांच्या पिकाला जर योग्य दर मिळाला तर शेतकरी सन्मानाचे जीवन जगू शकतो. त्यामुळे स्वामीनाथन अहवालाच्या आधारावर शेतकऱ्यांना भाव दिला जाईल. तसेच आमची पुढची गॅरंटी ही दिल्लीला संपूर्ण राज्याचा दर्जा देण्याचा असेल. याबरोबरच देशातील व्यापाऱ्यांसाठी धोरणं आखण्यात येईल. व्यापाऱ्यांना जास्त परवानग्यांची गरज असणार नाही.भाजपाच्या वॉशिंग मशिनला तोडण्याचं काम आमचे सरकार आल्यानंतर करणार आहे. सध्या भाजपा प्रामाणिक लोकांना तुरुंगात टाकण्याचं काम करत आहे आणि भ्रष्टाचारी लोकांना संरक्षण देत आहे, असेही केजरीवाल यांनी सांगितले. दरम्यान, मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. ते म्हणाले, "मोदींनी सांगितले होते की,प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये जातील. पण तसे काही झाले नाही. दोन कोटी नोकऱ्या ते देणार होते. पण त्याही मिळाल्या नाहीत. मात्र, दुसरीकडे उत्तम शाळा, मोहल्ला दवाखाने, यासह शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थेबाबत आम्ही हमी दिली होती आणि ती पूर्णही केली, असे केजरीवाल म्हणाले.

### दोन कोटी नोकऱ्या ते देणार

याबरोबरच कत्रांटी नोकऱ्या बंद करून कायमस्वरूपी नोकऱ्या दिल्या जातील. तसेच भारतीय सैन्यास विशेष अधिकार दिले जातील,असं आश्वासनही केजरीवाल यांनी दिलं. पुढं अरविंद केजरीवाल यांनी सांगितलं, शेतकऱ्यांच्या पिकाला जर योग्य दर मिळाला तर शेतकरी सन्मानाचे जीवन जगू शकतो. त्यामुळे स्वामीनाथन अहवालाच्या आधारावर शेतकऱ्यांना भाव दिला जाईल. तसेच आमची पुढची गॅरंटी ही दिल्लीला संपूर्ण राज्याचा दर्जा देण्याचा असेल. याबरोबरच देशातील व्यापाऱ्यांसाठी धोरणं आखण्यात येईल. व्यापाऱ्यांना जास्त परवानग्यांची गरज असणार नाही.भाजपाच्या वॉशिंग मशिनला तोडण्याचं काम आमचे सरकार आल्यानंतर करणार आहे. सध्या भाजपा प्रामाणिक लोकांना तुरुंगात टाकण्याचं काम करत आहे आणि भ्रष्टाचारी लोकांना संरक्षण देत आहे, असेही केजरीवाल यांनी सांगितले. दरम्यान, मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. ते म्हणाले, "मोदींनी सांगितले होते की,प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये जातील. पण तसे काही झाले नाही. दोन कोटी नोकऱ्या ते देणार होते. पण त्याही मिळाल्या नाहीत.

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पत्रकार परिषद घेत मोठ्या घोषणा केल्या आहेत. देशातील सर्व गरिबांना २०० युनिटपर्यंत मोफत वीज देण्याची घोषणा त्यांनी केली. आपल्या देशात ३ लाख मेगावॅट विजनिर्मिती करण्याची क्षमता आहे. मात्र, आपण त्याचा वापर फक्त २ लाख मेगावॅट एवढाच करतो, असं केजरीवाल यांनी सांगितलं.आमची दुसरी गॅरंटी ही शिक्षणसाठी आहे. सर्वांसाठी चांगले आणि उत्कृष्ट तसेच मोफत शिक्षण देऊ. सरकारी शाळा या खासगी शाळांपेक्षा जास्त चांगले शिक्षण देऊ शकतात. आम्ही शिक्षणाचे मॉडेल दिल्लीत राबवले आहे, असंही केजरीवाल यांनी सांगितलं.आम्ही तिसरी गॅरंटी ही आरोग्याची देत आहेत. प्रत्येकासाठी चांगल्या प्रकारचा उपचार मिळायला हवा. प्रत्येक गावात मोहल्ला दवाखाने उघडले जातील. जिल्हा रुग्णालयांचे मल्टीस्पेशालिटी रुग्णालयात रूपांतर केले जाईल, असंही केजरीवाल यांनी सांगितलं.अग्निवीर योजना लष्करासाठी घातक असून ती कायम स्वरुपी बंद केली जाईल.

# हिजाब घातलेली महिला भारताची पंतप्रधान असेल

## भारताच्या पंतप्रधानपदी मुस्लीम व्यक्ती कधी बसणार?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**तेलंगणाच्या हैदराबाद लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार सदुद्दीन ओवेसी हे यावेळी पाचव्यांदा लोकसभा निवडणुकीला सामोरे जात आहेत. उद्या (दि. १३ मे) हैदराबादमध्ये चौथ्या टप्प्यात मतदान पार पडणार आहे. ओवेसी यांच्या विरोधात भाजपने हिंदुत्ववादी नेत्या माधवी लता यांना उमेदवारी दिली आहे. ओवेसी यांनी मुस्लीम, मागासवर्गीय आणि इतर अल्पसंख्याकांना लक्ष्य करून आपली मतपेटी बांधली आहे.**



भाजपाच्या विरोधात कडाडून प्रचार करणाऱ्या ओवेसींनी इंडिया आघाडीशी युती केलेली नाही. ओवेसींचा हा निर्णय पक्षासाठी फायद्याचा की तोट्याचा? भारतीय राजकारणात मुस्लिमांचे स्थान काय? या विविध विषयांबाबत ओवेसींनी हिंदुस्तान टाइम्स या संकेतस्थळाला मुलाखत दिली आहे. या मुलाखतीमध्ये त्यांनी मुस्लीम व्यक्ती भारताचा पंतप्रधान कधी होणार? याबाबत भाष्य केले आहे.लोकसभा निवडणुकीचे तीन टप्पे झाले आहेत. या तीन टप्प्यात कोणते महत्त्वाचे मुद्दे वाटत आहेत? या प्रश्नावर बोलताना ओवेसी म्हणाले, "बेरोजगारी, महागाई हे प्रमुख मुद्दे आहेत. तसेच भाजपाने मुस्लीम वर्गाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. भाजपाप्रमाणेच इंडिया आघाडीनेही मुस्लीम समुदायापासून अंतर राखले आहे. महाराष्ट्र हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. महाराष्ट्रात ४८ मतदारसंघ आहेत. इंडिया आघाडीने एकाही मतदारसंघात मुस्लीम उमेदवार दिलेला नाही. राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि नवी दिल्लीतही हाच कित्ता गिरवला गेला आहे. जर मुस्लिमांना उमेदवारीही दिली जात नसेल, याचा अर्थ लोकसभेत त्यांचे प्रतिनिधित्व निश्चितच कमी होणार.इंडिय आघाडीशी सूत जुळविण्याबद्दल ओवेसी म्हणाले की, आमच्या पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी तीनवेळा इंडिया आघाडीचा

### मुस्लीम पंतप्रधान कधी होणार?

यावेळी ते म्हणाले, नक्कीच एकेदिवशी भारताला मुस्लीम पंतप्रधान मिळेल. त्यातही हिजाब घातलेली महिला मुस्लीम भारताची पंतप्रधान होईल. कदाचित तो दिवस पाहण्यासाठी मी जिवंत नसेल, पण एकेदिवशी नक्कीच हे घडेल, अशी आशा ओवेसी यांनी व्यक्त केली. तेलंगणाच्या हैदराबाद लोकसभा मतदारसंघाचे विद्यमान खासदार सदुद्दीन ओवेसी हे यावेळी पाचव्यांदा लोकसभा निवडणुकीला सामोरे जात आहेत. उद्या (दि. १३ मे) हैदराबादमध्ये चौथ्या टप्प्यात मतदान पार पडणार आहे. ओवेसी यांच्या विरोधात भाजपाने हिंदुत्ववादी नेत्या माधवी लता यांना उमेदवारी दिली आहे.

भाग होण्यासाठी निरोप दिला. मात्र त्यांच्या निरोपाची साधी दखलही इंडिया आघाडीने घेतली नाही. कुणी जर आम्हाला आघाडीत घ्यायला तयार नसेल तर आमच्यासाठी हा काही जगाचा अंत नाही. आम्ही आमच्या पद्धतीने आमची राजकीय वाटचाल सुरूच ठेवू. उत्तर प्रदेश आणि इतर काही राज्यात छोट्या पक्षांशी आम्ही आघाडी केली आहे.भारताला मुस्लीम पंतप्रधान कधी मिळणार? असाही प्रश्न असदुद्दीन ओवेसी यांना विचारण्यात आला होता.

# कतरिना कैफच्या प्रेग्नंसीबद्दलचं सत्य



बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ प्रेग्नंट असल्याची चर्चा काही दिवसांपासून सोशल मीडियावर सुरू आहे. बॉलिवूड अभिनेत्री कतरिना कैफ सध्या चांगलीच चर्चेत आहे. बॉलिवूडची ‘कॅट’ अर्थात कतरिना २०२१ मध्ये बॉलिवूड अभिनेता विकी कौशलसोबत लग्नबंधनात अडकली होती.

विकी आणि कतरिनाच्या लग्नाला दोन वर्ष झाली आहेत. अशातच आता कतरिना कैफ प्रेग्नंट असल्याच्या चर्चांना सुरुवात झाली आहे. अभिनेत्रीचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यानंतर अभिनेत्री प्रेग्नंट असल्याच्या चर्चांना जोर आला. या फोटोमध्ये कतरिनाच्या एका हातात कॉफीचा मग आणि दुसरा हात तिने पोटावर ठेवलेला दिसून आला होता. फोटो व्हायरल झाल्यानंतर नेटकऱ्यांनी अभिनेत्री प्रेग्नंट असल्याच्या चर्चांना सुरुवात केली. विकी कौशल प्रेग्नंट कतरिना कैफला भेटायला लंडनला रवाना झाल्याच्याही चर्चा सुरू झाल्या. आता या प्रेग्नंसीच्या बातमीत किती तथ्य आहे जाणून घ्या... विकी कौशलसोबत लग्न केल्यानंतर कतरिना कैफ प्रेग्नंट असल्याच्या अफवा अनेकदा समोर आल्या आहेत. चाहत्यांनी आता या अफवांवर विश्वास ठेऊ नये. कतरिना कैफ काही वैयक्तिक कामानिमित्त लंडनमध्ये आहे. आपल्या कुटुंबियांसमवेत ती वेळ घालवत आहे. आता विकी कौशलदेखील तिच्या ट्रिपमध्ये सहभागी झाला आहे”.

कतरिना कैफ जानेवारी २०२४ मध्ये आलेल्या ‘मेरी क्रिसमस’ या चित्रपटात झळकली होती. या चित्रपटात अभिनेत्री दाक्षिणात्य सुपरस्टार विजय सेतुपतीसोबत स्क्रीन शेअर करताना दिसली होती. कतरिनाचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. कतरिनाने अद्याप आपल्या आगामी प्रोजेक्टची घोषणा केलेली नाही. कतरिना कैफचे चाहत्यांना आता अभिनेत्रीच्या आगामी प्रोजेक्टची उत्सुकता आहे.

दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंह सप्टेंबर महिन्यात आई-बाबा होणार आहेत. दीपिका-रणवीरआधी ऋषा चड्ढा आणि अली अफज यांनी चाहत्यांना प्रेग्नंसीची गुडन्यूज दिली होती. काही दिवसांपूर्वी अनुष्का शर्माने मुलाला जन्म दिला. तसेच बॉलिवूड अभिनेत्री परिणीती चोप्रा लवकरच आई होणार असल्याचं म्हटलं जात आहे. अद्याप अभिनेत्री यासंदर्भात काहीही अधिकृत घोषणा केलेली नाही. कतरिना कैफ बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री आहे. हिंदी चित्रपटांसह तेलुगू आणि मल्याळी चित्रपटांमध्ये कतरिनाने काम केलं आहे. कतरिना परदेशात लहानाची मोठी झाली आहे. बुम या चित्रपटाच्या माध्यमातून तिने बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. कतिरनाचे मैने प्यार क्यू किया, नमस्ते लंडन, मेरे ब्रदर की दुल्हनिया, अजब प्रेम की गजब कहानी, राजनिती, जिंदगी ना मिलेगी दोबारा, एक था टायगर, टायगर जिंदा है, सुर्यवंशी असे अनेक चित्रपट सुपरहिट ठरले आहेत.

# प्राजक्ता आता निर्मितीक्षेत्रात



चित्रपट निर्मिती क्षेत्रात सहसा अभिनेते-अभिनेत्री येत नाहीत असे चित्र सिनेइंडस्ट्रीत एकेकाळी दिसायचे. मात्र मागील काही काळापासून अभिनेते-अभिनेत्री चित्रपट निर्मितीमध्ये उतरत आहेत. चतुरस्त्र अभिनेत्री प्राजक्ता माळीही आता सिनेनिर्मितीत उतरत आहे. गुरुवारी, प्राजक्ता माळीने काही कागदपत्रांवर सह्या करतानाचे फोटो शेअर केले होते. या फोटोचे गुपित आता उलगडले आहे. प्राजक्ता माळी निर्माती असलेल्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या लिहिलेल्या कांदबरीवर आधारीत चित्रपटाची घोषणा आज करण्यात आली आहे. मनोरंजन विश्वात स्वतःचं वेगळं स्थान असणारे पॅनोरमा स्टुडिओज आणि वेगवेगळ्या कलाकृतींमधून आपला ठसा उमटविणारी चतुरस्त्र अभिनेत्री प्राजक्ता माळी हे संयुक्त विद्यमाने ‘फुलवंती’ ही भव्य कलाकृती घेऊन रसिकांच्या भेटीला येत आहेत. हा चित्रपट पॅनोरमा स्टुडिओजची आजवरची सर्वात मोठी मराठी चित्रपट निर्मिती ठरणार आहे. तर, अभिनेत्री प्राजक्ता माळी यानिमित्ताने चित्रपट निर्मिती क्षेत्रात पदार्पण करीत आहे. या चित्रपटाचे लेखन-संवाद प्रविण विठ्ठल तरडे यांचे असून दिग्दर्शन स्नेहल प्रविण तरडे करीत आहेत. पखवाज आणि घुंगरांच्या जुगलबंदीचं ‘फुलवंती’ चित्रपटाचं पोस्टर अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर प्रदर्शित झालं आहे. आपल्या या नव्या प्रवासाबद्दल बोलताना प्राजक्ता माळीने सांगितले की, ‘फुलवंती’ सारखी दर्जेदार साहित्यकृती माझ्याकडे आल्याने मी निर्माती म्हणून एक भव्य कलाकृती करण्यास तयार झाले. यासाठी पॅनोरमा स्टुडिओजने मला भक्क्कम पाठिंबा दिल्याने माझा आत्मविश्वास उंचावला.

# अभिनयासाठी सोडले शिक्षण



अदा शर्माने तिचा नुकताच वाढदिवस साजरा केला. `द केरळ स्टोरी’ हा चित्रपट हिट झाल्यापासून अदा शर्माला ओळख मिळाली आहे.

अदा शर्माचा जन्म ११ मे १९९२ रोजी मुंबईतील एका तमिळ ब्राह्मण कुटुंबात झाला. अदा शर्माने १०वीत शिकत असतानाच ठरवलं होतं की तिला अभिनेत्री व्हायचं आहे. बारावीपर्यंत शिकून अदा इंडस्ट्रीत आली. अदाने तिच्या करिअरची सुरुवात २००८ मध्ये १९२० या चित्रपटातून केली होती. बॉलीवूड अभिनेत्री अदा शर्माने २००८ मध्ये १९२० या चित्रपटाद्वारे तिच्या करिअरची सुरुवात केली. त्याचा पहिलाच चित्रपट प्रेक्षकांना खूप आवडला होता. मात्र या चित्रपटानंतर अदा शर्मा हिट चित्रपटासाठी आसुसली होती. अदा शर्माला गेल्या १५ वर्षांत ‘द केरळ स्टोरी’ या चित्रपटात लीड म्हणून ओळख मिळाली. या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर चांगला प्रतिसाद मिळाला होता. या चित्रपटात अदा पूर्णपणे वेगळ्या आणि दमदार व्यक्तिरेखेत दिसली होती. चित्रपटात अदा शर्माने एका मल्याळी नर्सची भूमिका केली आहे, जी तिचा धर्म बदलते आणि दहशतवादी संघटना ISIS चा भाग बनते. अदा शर्माने गेल्या १५ वर्षांत अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. कमांडो ३ हसी तो फसी, हार्ट अटॅक यांसारख्या चित्रपटांचा समावेश आहे. पण एकही चित्रपट फारसा हिट ठरला नाही. बहुतेक चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरले आहेत. अदाने अनेक वेब सीरिज आणि शॉर्ट्स फिल्म्समध्ये काम केले आहे पण तिला आजपर्यंत विशेष ओळख मिळाली नाही.प

# बंगळुरुने नोंदवला सलग पाचवा विजय!

## 47 धावांनी उडवला दिल्ली कॅपिटल्सचा धुव्वा

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात आयपीएल २०२४ मधील ६२वा सामना पार पडला. एम. चिन्नास्वामी स्टेडियम खेळल्या गेलेल्या सामन्यात आरसीबीने ४७ धावांनी सलग पाचवा विजय मिळवत आपल्या प्लेऑफ्सच्या आशा कायम ठेवल्या. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने रजत पाटीदारच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर १८७ धावा केल्या होत्या. त्यानंतर आपल्या धावांचा बचाव करताना उत्कृष्ट क्षेत्ररक्षण आणि दमदार गोलंदाजीच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सला १४० धावांवर रोखत विजयावर शिक्कामोर्तब केला.**





आरसीबीने दिलेल्या १८८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सने ३० धावांत ४ विकेट्स गमावल्या होत्या. असे असतानाही संघाने पॉवरप्ले षटकांत ४ गडी गमावून ५० धावांचा टप्पा पार केला. अशा स्थितीत होप आणि अक्षर पटेल यांच्यात ५६ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी झाली. पण १०व्या षटकात लॉकी फर्ग्युसनने होपला २९ धावांवर बाद केले. यानंतर ११व्या षटकात केवळ ३ धावा काढून ट्रिस्टन स्टब्स बाद झाल्याने दिल्लीचा संघ अडचणीत आला. आता संघाकडे एकही फलंदाज उरला नव्हता. अक्षर पटेल एका टोकाकडून गड लढवत होता, तर दुसऱ्या बाजूने विकेट पडत होत्या. पंधराव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर रसिख दार सलाम १० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला.दिल्लीला विजयासाठी शेवटच्या ५ षटकात ६१ धावा करायच्या होत्या. १६व्या षटकात यश दयालने अक्षर पटेलला ५७ धावांवर पॅव्हेलियनमध्ये पाठवले, त्यामुळे बंगळुरूचा विजय जवळपास निश्चित झाला होता. दिल्लीने १८ षटकापर्यंत १३५ धावा केल्या होत्या, पण फक्त एक विकेट शिल्लक होती. शेवटच्या षटकात ४८ धावा करणे अशक्य होते. यानंतर दिल्लीचा संघ १४० धावांवर ऑलआऊट झाला, त्यामुळे आरसीबीने हा सामना ४७ धावांनी जिंकला.तत्पूर्वी नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने २० षटकांत ९ गडी गमावून १८७ धावा केल्या होत्या. बंगळुरूसाठी, कॅमेरून ग्रीनने २४ चेंडूत ३२ धावा केल्यानंतर नाबाद राहिला. तर रजत पाटीदारने ५२ धावांची तर विल जॅकने ४१ धावांची खेळी साकारली. दिल्लीकडून खलील अहमद आणि रसिख दार सलाम यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. तर इशांत शर्मा, मुकेश कुमार आणि कुलदीप यादव यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.आरसीबीचे १३ सामन्यांत सहा विजय आणि सात पराभवांसह त्यांचे १२ गुण आहेत. दिल्लीवरील विजयासह संघ पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. बेंगळुरूला शेवटचा सामना १८ मे रोजी चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध चिन्नास्वामी येथे खेळायचा आहे. या सामन्यावर दोन्ही संघांचे भवितव्य अवलंबून असेल. चेन्नई जिंकल्यास आरसीबी प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडेल. त्याचवेळी, आरसीबी जिंकल्यास त्याला चांगल्या फरकाने जिंकावे लागेल, जेणेकरून नेट रन रेट चेन्नईपेक्षा चांगले होऊ शकेल. यानंतरही बंगळुरूला इतर संघांच्या निकालावर अवलंबून राहावे लागणार आहे.बंगळुरू-दिल्ली आणि लखनऊ या तिघांचेही १२-१२ गुण आहेत. लखनऊने आतापर्यंत केवळ ११ सामने खेळले असून हा संघ १६ गुणांपर्यंत पोहोचू शकतो. त्याच वेळी, दिल्ली आणि बंगळुरू यांनी १३-१३ सामने खेळले आहेत. या पराभवामुळे दिल्लीला आता केवळ १४ गुणांपर्यंतच मजल मारता येणार आहे. मात्र, यासाठी त्यांना १४ मे रोजी लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध त्यांच्या घरच्या मैदानावर विजय मिळवावा लागेल. कोलकाता संघ आधीच १८ गुणांसह प्लेऑफ्ससाठी पात्र ठरला आहे. त्याचवेळी राजस्थान १२ सामन्यांत १६ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. चेन्नईचे १३ सामन्यांनंतर १४ गुण आहेत.

### सलाम 10 धावा करून पॅव्हेलियनमध्ये

आरसीबीने दिलेल्या १८८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सने ३० धावांत ४ विकेट्स गमावल्या होत्या. असे असतानाही संघाने पॉवरप्ले षटकांत ४ गडी गमावून ५० धावांचा टप्पा पार केला. अशा स्थितीत होप आणि अक्षर पटेल यांच्यात ५६ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी झाली. पण १०व्या षटकात लॉकी फर्ग्युसनने होपला २९ धावांवर बाद केले. यानंतर ११व्या षटकात केवळ ३ धावा काढून ट्रिस्टन स्टब्स बाद झाल्याने दिल्लीचा संघ अडचणीत आला. आता संघाकडे एकही फलंदाज उरला नव्हता. अक्षर पटेल एका टोकाकडून गड लढवत होता, तर दुसऱ्या बाजूने विकेट पडत होत्या. पंधराव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर रसिख दार सलाम १० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला.

# चेन्नई सुपर किंग्जच्या प्लेऑफ्सच्या आशा कायम

## चेन्नईने 18.2 षटकांत 5 गडी राखून विजय मिळवला

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमए चिदंबरम स्टेडियमवर आयपीएल २०२४ मधील ६१ वा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळला गेला. या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने राजस्थान रॉयल्सवर ५ विकेटसनी मात करत प्लेऑफ्सच्या आपल्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. त्याचबरोबर राजस्थान रॉयल्सचा हा सलग तिसरा पराभव आहे. त्यामुळे राजस्थान रॉयल्सच्या अडचणी काही प्रमाणात वाढल्या आहेत. तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने चेन्नईसमोर १४२ धावांचे लक्ष्ये ठेवले.**





प्रत्युत्तरात चेन्नईने १९ षटकांत ५ गडी गमावून विजयावर शिक्कामोर्तब केला. या विजयासह चेन्नई घरच्या मैदानावर विजयाचे अर्धशतक पूर्ण केले.राजस्थान रॉयल्सने दिलेल्या १४२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नई सुपर किंग्जने राजस्थान रॉयल्सचा ५ गडी राखून पराभव करत प्लेऑफ्समध्ये पोहोचण्याचा दावा मजबूत केला. लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईने १८.२ षटकांत ५ गडी राखून विजय मिळवला. कर्णधार ऋतुराज गायकवाडने संघासाठी सर्वात मोठी खेळी खेळली. त्याने ४१ चेंडूत १ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने नाबाद ४२ धावा केल्या. या दरम्यान राजस्थानकडून रविचंद्रन अश्विनने सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या.या विजयासह चेन्नईने प्लेऑफ्सच्या शर्यतीत स्वतःला कायम ठेवले असून गुणतालिकेत अव्वल चारमध्ये आपले स्थान मजबूत केले आहे, तर राजस्थानची बाद फेरी गाठण्याची प्रतीक्षा वाढली आहे. चेन्नई संघ १३ सामन्यांत ७ विजय आणि ६ पराभवांसह १४ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे, तर राजस्थान संघ १२ सामन्यांत ८ विजय आणि ४ पराभवांसह १६ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. राजस्थानचा संघ हा सामना जिंकण्यात यशस्वी ठरला असता, तर केकेआरनंतर या हंगामात प्लेऑफ्समध्ये पोहोचणारा हा दुसरा संघ ठरला असता, परंतु चेन्नईने त्यांची प्रतीक्षा वाढवली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय राजस्थान

### चेन्नईसमोर 142 धावांचे लक्ष्ये ठेवले

कर्णधार संजू सॅमसन १५ धावा करून बाद झाला. रियान परागने चांगली फलंदाजी करत ३५ चेंडूत नाबाद ४७ धावा केल्या. ध्रुव जुरेल २८ धावा करून बाद झाला. चेन्नई सुपर किंग्जकडून सिमरजीत सिंगने सर्वाधिक तीन बळी घेतले. तर तुषार देशपांडेने दोन गडी बाद केले. एमए चिदंबरम स्टेडियमवर आयपीएल २०२४ मधील ६१ वा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात खेळला गेला. या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने राजस्थान रॉयल्सवर ५ विकेटसनी मात करत प्लेऑफ्सच्या आपल्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. त्याचबरोबर राजस्थान रॉयल्सचा हा सलग तिसरा पराभव आहे. त्यामुळे राजस्थान रॉयल्सच्या अडचणी काही प्रमाणात वाढल्या आहेत. तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने चेन्नईसमोर १४२ धावांचे लक्ष्ये ठेवले.